ग्रं. सं. ठाणें



REFBK-0010585
REFBK-0010585

# अभंग-तुकाराम

मराठी ग्रंथ सं. ठाणें. ग्रंथालय
अनुक्रम 24993 दि. 3/10/1
क्रमांक 9234 नों. दि. 9/3/1/1/4

# अभंग-तुकाराम

[ न भंग पावे भरताही नित्य ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
रा. क्र. 90544
ग्रंथ शाखा

: लेखक :
रा. वि. कामत, बी. ए. बी. टी.
ॲ. ॲडमिलस्ट्रेटिव्ह ऑफिसर
डिस्ट्रिक्ट स्कूल बोर्ड, ठाणें

REFBK-0010585

: प्रकाशक :
तुकाराम बुक डेपो,
माधवबाग, मुंबई ४.

शके १८८१ ] मूल्य ३१ नये पैसे [ सन १९५९

: प्रकाशक :
शिवराम नारायण कस्तुर
: मॅनेजर :
तुकाराम बुक डेपो,
माधवबाग, मुंबई ४.

आवृत्ति पहिली

: मुद्रक :
शरद कृष्णाजी सापळे,
रामकृष्ण प्रिं. प्रेस,
मोरबाग रोड,
दादर, मुंबई १४.
टे. नं. ६२८७५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें
अनुक्रम २५११३ दि.
क्रमांक ९८३४ नों. दि.
मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. १०५८

# अभंग-तुकाराम

**स्वात्मानुभाव पहातां तुकया केवळ सख्याचें जनकाचा ।**
**वैराग्यें डोलविला माथा जेणें मुनींद्र सनकाचा ॥ १ ॥**

मोरोपंत.

न भंग पावे भरतांहि नित्य । असें सागराचें यथार्थ वर्णन केलेलें आहे तेंच बरोबर आपल्या तुकाराम महाराजांना पण लागू आहे. कितीहि काळ लोटला—अनंत अंत पावेल, पण तुकाराम महाराज आपल्या अभंग वाणीमुळें भंग पावणार नाहींत. ज्याप्रमाणें समुद्र सर्व तऱ्हेचें पाणी सामावून—घेऊन कधींही कितीही भरला तरी आपली मर्यादा ओलांडीत नाहीं त्याप्रमाणें तुकाराम महाराज हे संसारातील आघात, हाल सोसून, परिस्थितीचे टक्के टोणपे खाऊनहि आपली मानसिक शांतता जराही कमी न करतां अभंग राहिले, व रागांतूनच जनतेवर अनुराग केला. अमर अभंग काव्य निर्माते झाले.

तुकाराम महाराजांचें नांव माहीत नाहीं असा महाराष्ट्रांत एकहि मनुष्य सांपडणार नाहीं. इतकेंच नव्हे तर अगदीं सामान्य प्रतीच्या अशिक्षित मनुष्याच्या तोंडून सुद्धां आपणांस "ग्यानबा तुकाराम" हे शब्द ऐकावयास मिळतात ह्याचा अर्थच काय ? ज्ञानेश्वर व तुकाराम हे महाराष्ट्राचे दोन महापुरुष आहेत, कीं ज्यानीं महाराष्ट्राला दिव्यदृष्टि निर्माण करून दिली, महाराष्ट्राला अनंतकाळपर्यंत ज्ञानमार्ग व भक्तिमार्ग या द्वारें ऐहिक संसारसागरांत, धकाधकीच्या

मामल्यांत मार्गदर्शन करणार, भवसागरांतून उद्धरून नेऊन सहजपणें मोक्ष मिळवून देणारे हे थोर संत आहेत प्रत्येक मराठी माणसाला ह्या दोन्हीं संतांच्या एक-दोन तरी पद्यपंक्ति मुखोद्गत असतातच. ह्या दोन संतांच्या काव्यांनींच महाराष्ट्रीय माणसांची आध्यात्मिक ज्ञानाची तहान भागवीत आणलेली आहे व जो जो काळ लोटत आहे तों तों त्यांतून ज्ञानपिपासू परमेश्वरभक्तां-करितां ह्या काव्यांमधून नवीन नवीन ज्ञानजलाचे झरे निर्माण होत आहेत. ज्ञानोबा—तुकारामांचें हें ऋण त्यांना कितीहि नोबेल पारितोषकें दिलीं तरीं संपणार नाहीं व त्याकरितां प्रत्येक महाराष्ट्री-यालाच नव्हे तर प्रत्येक हिंदी माणसाला ह्या अमर संत—जोडीला विसरून कधींहि चालणार नाहीं. तुकाराम महाराजांचें साधें काव्य एवढें अमर होण्याचें कारण खरें एकच आहे कीं, ज्या तत्त्वांचा आम्हीं आज प्रचार करीत आहोंत, तीं तत्त्वें तीनशें वर्षांपूर्वीं कोणाचीहि व कशाचीहि पर्वा न करतां, त्यांनीं प्राण पणाला लावून अमलांत आणलीं व त्यांचा प्रचार केला. त्याचप्रमाणें प्रत्येक व्यक्तीची अंतिम मोक्षाची कल्पना, ईश्वराची भेट, संसार-सागरामधून मुक्तता—ह्याकरितां संसार सोडून रानावनांत जाण्याची कांहींही आवश्यकता नाहीं; तर संसारांत राहूनच "अवघाची संसार सुखाचा" करून केवळ घरबसल्या भक्तिमार्गानें ईश्वराची भेट कशी घेतां येईल हें सर्वांना दाखवून दिलें. ईश्वराच्या घरचा दरवाजा सामान्य माणसालाही खुला करून दिला.

अशा ह्या श्रेष्ठ तुकाराम महाराजांचा जन्म पुण्याजवळच इंद्रायणी नदीकाठीं देहू गांवीं अंबिले नांवाच्या उच्च घराण्यामध्यें झाला. त्यांच्या जन्मतिथीबद्दल वाद आहे. परंतु जी कांहीं माहिती उपलब्ध आहे त्यावरून त्यांचा जन्म शके १५३० मध्यें झाला. कांहीं दिवस त्यांनीं 'मोरे' हें नांव धारण केलें होतें, पण देहूकरगोसावी ह्या नांवानें ते बरेच वर्षें प्रसिद्ध होते.

कुणबी समाजांतील हा एक प्रसिद्ध समाज आहे. तुकाराम महाराज हे जातीनें कुणबी होते. शिपाईगिरी हा त्यांच्याकडे पिढीजात व्यवसाय होता. परंतु तुकाराममहाराजांचा जन्म झाल्यापासून त्यांच्या घरीं व्यापार करण्यास सुरवात झाली. पहिल्यानें दुकान घातलें. व्यापार करूं लागले म्हणून लोक त्यांना व्यापारी अशा अर्थी 'वाणी' ह्या नांवाच्या जातीनें ओळखूं लागले. तुकाराममहाराजांना आपल्या उंचनीच जातीबद्दल कधींही कमीपणा वाटत नसे. उलट ते स्वतःला नेहमीं हलकेच समजत व ते म्हणत.

**शूद्रवंशीं जन्मलों । म्हणोनी दंभें मोकलिलों ॥**
**अरे तूंच माझा आतां । मायबाप पंढरिनाथा ॥**
**घोकाया अक्षर । मज नाहीं अधिकार ॥**
**सर्वभावें दीन । तुका म्हणे यातिहीन ॥**

मी हलक्या कुळांत जन्माला आलों हेंच चांगलें झालें. कारण, मी जर उच्च कुळांत जन्मलों असतों तर उच्च कुळींचा मला गर्व झाला असता. ईश्वर, पंढरिनाथ भगवान् हाच माझा खरा मायबाप आहे. वेद–पठण व अभ्यास करण्याचा नीच कुळामुळें मला अधिकार नाहीं, त्यामुळें सर्व तऱ्हेनें मी दीन आहें व त्यामुळेंच खरा ईश्वरसेवक बनलों आहें.

**याती शूद्र वैश्य केला वेवसाव ॥**

जातीचा शूद्र असल्यानेंच मी ज्ञानार्जन न करितां व्यापार सुरू केला.

**बरें देवा कुणबी केलों । नाहीं तरी दंभें असतों मेलों ॥**
**भलें केलें देवराया । नाचे तुका लागे पायां ॥**
**विद्या असती कांहीं । तरी पडतों अपायीं ॥**
**सेवा चुकतों संतांची । हेचि नागवण फुकाची ॥**
**गर्व होता ताठा । जातों यमपंथें वाटा ॥**
**तुका म्हणे थोरपणें । नरक होती अभिमानें ॥**

हे परमेश्वरा, तूं मला शेतकरी केलेंस हें फार चांगलें केलेंस, नाहींतर मोठा झालों असतों तर घमेंडीनें, गर्वानें वृथा एकटाच नाश पावलों असतों.

असें भजन करीत ईश्वराच्या भजनामध्यें तुकाराममहाराज नाचतात, गातात ब्रह्मानंद पावतात व ईश्वराचे चरण चुरीत आहेत. पुढें ते म्हणतात,

कीं जर मी एखाद्या विद्येंत प्रवीण असतों तर माझी बुद्धी कोठेंतरी चालवून एखाद्या मोठ्या कचाट्यांत सांपडून फसलों असतों. चांगल्या लोकांची संगत केली नसती. इकडे तिकडे भटकत बसलों असतों. जर मी असा एखादा साधा शेतकरी नसतों तर मला भयंकर गर्व झाला असता व मी लवकरच नरकाच्या मार्गांत गेलों असतों. मनुष्य हा मोठेपणाच्या घमेंडीनें माणसांतून उठतो व लवकरच मृत्यूच्या मार्गाकडे लागत असतो. गर्वाचें घर खालीं येत असतें.

प्रत्येक एकादशीला पंढरपूर क्षेत्रीं, विशेषें करून आषाढी व कार्तिकी एकादशीला मोठा उत्सव होत असतो. लाखों भाविक लोक ह्या यात्रेस आपापल्या खेड्यापाड्यांतून पायीं जात असतात. त्यांना वारकरी पंथाचे भक्तसेवक म्हणतात. हजारोंनीं खेड्यांतून हा रिवाज चालत आलेला आहे, शेकडों वर्षें चालत आहे व तो कधींहि थांबणार नाहीं. पंढरपूरक्षेत्रीं श्रीविठ्ठलाची एक मूर्ति आहे. ह्याला विठ्ठल किंवा पांडुरंग असेंही म्हणतात. हा विष्णूचा अवतार आहे. पंढरपुरला या विठोबाची दर एकादशीला, विशेषेंकरून आषाढी व कार्तिकी एकादशीला मोठी यात्रा भरत असते. यात्रेलाच ‘ वारी ’ असें दुसरें नांव आहे. ह्या यात्रेला जाणारे जे भक्त त्यांना ‘ वारकरी ’ असें नांव आहे. ह्या यात्रेकरूना व विठ्ठलाच्या भक्तांना वारकरी पंथाचे अनुयायी म्हणतात. हा एक स्वतंत्र पंथ आहे. वारकरी पंथास स्वतंत्र ‘ वारकरी संप्रदाय ’ असेंही नांव आहे. हे वारकरी संप्रदायाचे लोक गळ्यामध्यें तुळशीच्या माळा घालतात. नेमानें हरिपाठ म्हणतात. वारकरी

मांसाहार करीत नाहींत, दारू पीत नाहीत. चोरी करणें, खोटें बोलणें, मद्यसेवन ह्या सर्वांपासून ते अलिप्त रहातात. ह्या वारकरी संप्रदायाचे महाराष्ट्रांत आज लाखों लोक जिकडे तिकडे पसरलेले आहेत. ज्ञानेश्वर व तुकाराम ह्या दोन महान् संतांचें नांव घेत घेत "ज्ञानबा तुकाराम", असें मोठ्यानें गर्जत पालखी समोर नाचत नाचत, भजन करीत, हे वारकरी दरसाल पंढरपूरची एकादशीला पदयात्रा करीत असतात.

तुकाराम महाराजांच्या वडिलांचे नांव बोल्होबा व मातेचें नांव कनकाई. दोघेंहि ईश्वराची मोठीं परमभक्त होतीं. तुकारामाची पहिली बायको नेहमी दम्यानें आजारी असे. तिचें नांव रखमाई होतें. तुकाराम महाराजांनी पुण्याच्या एका मोठ्या बड्या सावकाराच्या मुलीशीं दुसरें लग्न केलें. या दुसऱ्या बायकोचें जिजाबाई असें नांव ठेवलें. ह्या दुसऱ्या बायकोपासून तुकाराम महाराजांना तीन मुलगे व तीन मुली अशीं सहा मुलें झालीं. सर्वांत मोठ्या मुलाचें नांव नारायण ठेवलें. तो शेवटपर्यंत ब्रह्मचारी होता.

तुकाराम महाराजांचें पहिल्यापासूनच व्यवहारांत लक्ष कमी होतें. त्यांच्याजवळ जो कांहीं पैसाअडका होता तो त्यांनीं गरिबांना देऊन टाकला. त्यांचें दानधर्माकडे लक्ष फार होतें. त्यांना व्यापारांत फार नुकसान सोसावें लागलें. जे कोणी त्यांच्याकडून उधार माल नेत असत ते त्यांचे पैसे बुडवीत, त्यामुळें त्यांच्या दुकानाचें दिवाळें निघालें. तेव्हां मिरची, डाळ, मीठ असा माल पाठीवर गोणीनें भरून त्यांनीं एका गांवाहून दुसऱ्या गांवास पायीं जाऊन विकण्यास सुरवात केली. ह्यांत पण त्यांच्या भोळेपणाचा फायदा घेऊन लोकांनीं फसविण्यास सुरुवात केली. एकदां असाच माल विकून तुकाराम महाराज आपल्या विक्रीचे पैसे घेऊन परत येत होते. एक म्हातारा त्यांना रस्त्यांत भेटला. त्यानें तुकारामाजवळ मदत मागितली. आपला

मुलगा नुकताच मेला असून जमीन गहाण पडली आहे व सावकाराच्या कबजांत गेली असें रडगाणें गाइलें व मदत मागीतली. तेव्हां तुकाराम महाराजांना त्यांची दया आली व ताबडतोब आपले विक्रीचे आलेले पन्नास ५० रुपये त्याला देऊन टाकले व त्यास कब्जेगहाण असलेलें शेत सोडविण्यास सांगीतलें. तुकोबा रिकामे घरीं परत आले तेव्हां त्यांच्या पत्नीनें जिजाबाईनें त्यांची चांगलीच संभावना केली. असा रोजचाच प्रकार चाललेला होता.

१६३० सालीं महाराष्ट्रांत मोठा दुष्काळ पडला. मनुष्यहानी पण फार झाली. तेव्हां तुकाराम महाराजांची पहिली पत्नी रखमाबाई व तिचा मुलगा संभाजी हे पण ह्या दुष्काळाचे बळी ठरले. तेव्हां ह्या आघातानें महाराजांच्या मनावर मोठा परिणाम झाला व ते गांव सोडून लांब एका जंगलांत गुहेंत राहून ईश्वरोपासना ध्यान करूं लागले. ध्यान करतां करतां त्यांना ध्यानमग्न स्थितींत असतां खरोखरच एकदा ईश्वरी साक्षात्कार झाला. त्यांनीं ही तपश्चर्या खरोखरच अन्नपाण्यावांचून अशी चालवली होती. चैतन्य गुरु प्रसन्न झाले व प्रसन्न होऊन त्यांनीं स्वप्नांत 'रामकृष्ण हरि' हा गुरुमंत्र दिला. तेव्हांपासूनच तुकाराम महाराजांनीं खऱ्या काव्यरचनेस सुरवात केली. हेच ते अभंग होत व त्या अभंगांतून आपल्या हृदयांतील विचार ते प्रकट करूं लागले. त्यांची ही कविता अभंगाच्या छंदांमधून आहे. जसे कबीराचे दोहरे, पदें प्रसिद्ध आहेत, तसेच तुकारामाचे अभंग प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्रामध्यें कीर्तन करणें हा ज्ञानार्जनाप्रमाणेंच केवळ ब्राह्मणांचाच जन्मसिद्ध हक्क समजला जात असे. परंतु तुकाराममहाराजांनीं हे निर्बंध सोडून दिले व कीर्तनें करण्यास सुरवात केली. तेव्हां ब्रह्मतेज जागें झालें. ब्राह्मणांना भयंकर राग आला. हा कोण आपल्यासारखा वागणारा ! ज्ञान व कीर्तन ही आपलीच मक्तेदारी आहे, ह्यावर गदा आणणारा हा वाणी कुणबी कोण ? असें म्हणून त्यांनीं तुकाराममहाराजांस जाणून-बुजून त्रास देण्यास—सतावण्यास सुरवात केली.

एकदां तुकाराम महाराजांकडे एक वाईट चालीची बाई आली व तिनें त्यांना एकांतांत गांठून त्यांचें प्रियाराधन करण्यास तिनें सुरवात केली. तुकाराममहाराजांनीं तिला खडखडीत उत्तर दिलें तें खरोखरच विचार करण्यासारखें आहे, कीं हें वाचल्यावर मोठमोठ्या चारित्र्यवान् ब्रह्मपुरुषांनीं मान खालीं घालावी. तुकोबा म्हणाले,

**" पराविया नारी रखुमाईसमान । गेलें हें नेमून ठायींचेंची ॥**
**जाई वो तूं माते न करी सायास । आम्हीं विष्णुदास तैसे नव्हे ॥**
**न सहावें मज तुझें हें पतन । नको हें वचन दुष्ट वदों ॥**
**तुका म्हणे तुज पाहिजे भ्रतार । तरी काय नर थोडे जाले ॥ "**

आम्हीं प्रत्येक परकीय स्त्रीला मातेसमान समजतों व ही गोष्ट माझ्या मनामध्यें पक्की रुतून बसलेली आहे. आम्हीं विष्णूचे दास आहोंत व आम्हीं आमची बदनामी करून घेणार नाहीं. कोणत्याहि तऱ्हेची वाईट अपेक्षा धरूं नको व पुढें तुकाराम महाराज तिला म्हणाले, 'जर तुला प्रियकर पाहिजे असेल तर गांवांमध्यें लोक काय कमी आहेत ?'

तुकारामाचा तो पवित्र देह पाहिल्यावर व ओजस्वी भाषण ऐकल्यावर ती स्त्री मनामध्यें शरमून गेली व ती पुढें त्याची दासीभक्त झाली.

तुकाराम महाराज आपल्या अभंगांविषयीं म्हणतात कीं मी जें कांहीं लिहिलें आहे तें मी कांहीं लिहिलेलें नाहीं. तर भगवंतानें माझ्याकडून लिहवून घेतलेलें आहे. मी फक्त निमित्तमात्र आहें— मी भगवन्ताचा नोकर आहें—

**साळुंकी मंजुळ बोलतसे वाणी । बोलविता धणी वेगळाची ॥**
**काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें । परि त्या विश्वंभरें बोलविलें ॥**

मैना अगदीं गोड आवाजांत गाणें म्हणत असते पण तिचा गोड आवाज ज्यानें तिला दिलेला असतो तो वेगळाच असतो. तिचें बोलणें आम्हांला काय बरें समजणार? त्याच भगवंतानें आम्हांस हें सर्व दिलेलें आहे व तोच हें सर्व आमच्याकडून बोलवून घेत आहे.

लोकांना तुकाराममहाराजांची ही विद्वत्ता पहावली नाहीं. ते त्यांचा फार द्वेष करीत असत. त्यांच्या एका द्वेष्ट्यानें तर त्यांचे सर्व अभंग पहाण्याच्या निमित्तानें त्यांच्याजवळून घेतले व त्या सर्व पोथ्या:एकदम इंद्रायणी नदींत नेऊन बुडविल्या. हें तुकाराममहाराजांस कळतांच त्यांस फार वाईट वाटलें. त्यांना कांहीं सुचेना. त्यानें त्या माणसास कांहींच केलें नाहीं व इंद्रायणी नदीकाठीं जाऊन देवाच्या नांवानें प्राणांतिक उपोषण सुरू केलें. देवाला गाऱ्हाणें घातलें. आठ दिवस सतत अन्नपाण्यावाचून तुकाराम महाराजांचें हें प्राणांतिक उपोषण पाहून अखेर देवास दया आली. त्यानें एका बालकाचें रूप धारण केलें व इंद्रायणी नदींतून सर्व ग्रंथ बाहेर काढले व त्या पोथ्या तुकाराम महाराजांच्या स्वाधीन केल्या. हें सर्व लोकांनीं प्रत्यक्ष पाहिलें. त्यांचा तुकाराममहाराजांवरचा विश्वास अधिक दृढ होऊन ते त्यांच्या पायीं पडूं लागले. ते तुकारामास देव समजूं लागले व तुकारामाचे शत्रू सुद्धां त्याचे भक्त बनले.

याच काळांत महाराष्ट्रामध्यें शिवाजीसारखा महापुरुष महाराष्ट्रास स्वतंत्र करण्यांस झटत होता. त्याचा पाठलाग मोंगल लोकांनीं चालविलेला होता. पण शिवाजीस पराभव हा माहीतच नव्हता. शिवाजी ह्या वेळेस अनभिषिक्त राजेच बनलेले होते. त्यांच्या कानावर संत तुकाराममहाराजांचें नांव फार ऐकूं येत होतें. शिवाजीमहाराजांना तुकारामबावांविषयीं आदर वाटूं लागला व प्रेमाची भेट म्हणून त्यांनीं त्यांस पालखी, छत्र, घोडा, भोई, शेकडों नजरबंद मोहरा असा राजशाही नजराणा भेट म्हणून पाठविला. पण तुकाराममहाजांनीं तो परत पाठविला व शिवाजीमहाराजांस कळविलें—

**दिवटीया छत्री घोडे । हे तो बऱ्यांत न पडे**

आम्हांला या नजराण्याचा काय उपयोग बरें ? आम्ही विष्णुदास. साधी रहाणी व उच्च विचारसरणी, हें तर आमचें जीवन.

हा चमत्कार पाहून शिवाजीमहाराज स्वत: महाराजांचे भेटीस आले. त्यांच्या कीर्तनसभेंत कीर्तन ऐकण्यास जाऊन बसले. हें मुसलमानसरदारास कळलें. त्याला वाटलें शिवाजीमहाराजांस पकडण्यास ही संधी फार चांगली आहे. त्यानें कीर्तन चालू असलेल्या सबंध देवळास वेढा दिला. हें पाहिल्याबरोबर तुकाराममहाराजांच्या प्रसंग लक्षांत आला. त्यांनीं देवास गाऱ्हाणें घालून आळविण्यास सुरवात केली.

**न देखवे डोळां ऐसा हा आकान्त । परपीडें चित्त दुःखी होतें ॥**

हे देवा ! हा दुसऱ्याचा छळ माझ्याच्यानें पहावत नाहीं. दुसऱ्याच्या जीवाला ह्या होणाऱ्या यातना पाहून माझ्या मनाला फार त्रास होत आहे. हें गाऱ्हाणें देवाला समजलें व त्यांना करुणा आली. देवांनीं आपल्या प्रभावी शक्तीनें प्रत्येक व्यक्तिस शिवाजीचें रूप दिलें. तेव्हां मोंगल सरदारांना खरा शिवाजी कोण हेंच समजेना. ते एकदम गोंधळले व त्यांनीं त्याचा नाद सोडला व देवळाभोंवतालचा वेढा उठवून ते निघून गेले.

तुकाराम महाराजांच्या जीवनांतील असले हजारों प्रसंग सांगितले जातात. पण एक गोष्ट निर्विवाद कीं तुकाराम महाराज हे महान् अमर संत होऊन गेले. ईश्वराचे ते परम भक्त होते व ईश्वराचें पण त्यांच्यावर अगाध प्रेम होतें. त्यांनीं लोकांना भक्तिमार्ग दाखविला. तुकोबा म्हणत, प्रत्येक वस्तूंत ईश्वर भरलेला आहे तेव्हां हरएक प्रसंगीं, प्रत्येक कामाच्यावेळीं ईश्वराचें नांव घ्यावें. ईश्वराच्या नांवाशिवाय कार्यसिद्धि नाहीं. परंतु देवाच्या, खुदाच्या नांवानें भिक्षा मागणें, भीक मागण्याकरतां, उदरनिर्वाहाकरितां किंवा पैसा मिळविण्याकरितां ईश्वराचें नांव घेणें, हें त्यांना बिलकुल आवडत नसे. ते म्हणत—

**भिक्षापात्र अवलंबणें। जळो जिणें लाजिरवाणें.**

सबंध देह भस्म झाला, नाश पावला तरी हरकत नाहीं, पण हें भिक्षा मागणें—भीक मागणें—नको !

शके १६४९ फाल्गुन महिना—फाल्गुन वद्य द्वितीया १७०५ विक्रम संवत्सर रोजीं विठ्ठलाचें कीर्तन—करतां करतां कीर्तनांतूनच तुकाराम महाराज एकाएकीं एकदम नाहीसे झाले. लोकांना उपदेश करीत असतांनाच त्यांनीं सदेह स्वर्गप्रवेश करीत ह्या लोकांतून, लोक कीर्तन ऐकत असतांनाच—आम्ही जातों आमुच्या गांवा। आमुचा राम राम घ्यावा॥ असें म्हणत वैकुंठाला गेले. देवाच्या घरीं देवदर्शनार्थ तुकाराम महाराज सदेह गेले ह्यावर लोकांचा अजूनही विश्वास आहे. एक गोष्ट सत्य कीं जोंपर्यंत महाराष्ट्रांत मराठी भाषा बोलली जात आहे व जोंपर्यंत महाराष्ट्रांत मराठी रक्त जिवंत आहे तोंपर्यंत 'ज्ञानबा तुकाराम !' शब्द नाहींसे होणार नाहींत व ज्ञानेश्वर—तुकाराम ही संत—जोडी महाराष्ट्रीय विसरणार नाहींत. तुकाराम बोवा गेले पण अमर झाले.

तुकाराम महाराजांनीं एकूण सुमारें ४०००, चार हजार अभंग लिहिले. ते ग्रंथरूपानें कित्येक ठिकाणीं प्रसिद्ध झालेले आहेत. त्या ग्रंथास 'तुकारामाची गाथा' असें नांव आहे. अभंगांची भाषा किती मधुर आहे व त्याहूनही त्यांमध्यें भरलेला अर्थ किती गंभीर व अमर आहे हें पहावयाचें असेल तर आतां कांहीं महत्त्वाच्या अभंगांचा आपण अभ्यास करूं या ?—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २५११३ वि: काव्य
क्रमांक २४३५ नों. दि. १३।८।६०

## श्री तुकाराम महाराजांचे कांहीं

# निवडक अभंग व त्यांचा अर्थ

पवित्र तें कुळ पावन तो देश । जेथें हरिचे दास जन्म घेती ॥
कर्म धर्म त्यांचा झाला नारायण । त्यांचेनी पावन तीन्ही लोक ॥
वर्ण अभिमानें कोण झाले पावन । ऐसें द्या सांगून मजपाशीं ॥
अंत्यजादि योनी तरल्या हरिभजनें । तयांचीं पुराणें भाट झालीं ॥
वैश्य तुळाधार गोरा तो कुंभार । धागा हा चांभार रोहिदास ॥
कबीर मोमीन, लतीफ मुसलमान । सेना न्हावी जाण विष्णुदास ॥
कान्होपात्रा खोडु, पिंजारी तो दादू । भजनीं अभेदु, हरिचे पायीं ॥
चोखा मेळा बंका जातीचे महार । त्यासी सर्वेश्वर ऐक्य करी ॥
नामयाची जनी कोण तिचा भाव । जेवी पंढरीराव तिये सवें ॥
मैराळ जनक कोण कुळ त्याचें । महिमान तयाचें काय सांगों ॥
यातायातीधर्म नाहीं विष्णुदासा । निर्णय हा ऐसा वेदशास्त्रीं ॥
तुका म्हणे तुम्ही विचारावे ग्रंथ । तारिले पतित नेणों किती ॥

ज्या कुळामध्यें हरीचे भक्त जन्माला येतात तें कूळ व तो देश धन्य होय. तो देश व तें कुळ पवित्र होय.

जातीचा अभिमान धरून कोण बरें मोठा झालेला आहे? हरीच्या नांवानेंच सर्व जातींचा उद्धार झालेला आहे. ह्या हरि सत्याचें नांव पुराणांत भरभरून राहिलेलें आहे. संत तुलाधार हा जातीनें वैश्य व गोरा हा कुंभार होता. रोहिदास चांभार होता, कबीर मोमिन

होता, लतीफ मुसलमान होता, सेना न्हावी होता, पण हे सर्व विष्णुदास होते, देवभक्त होते व देवानें सर्वांना सारख्याच मानानें वागविलें. कान्होपात्रा ही वेश्या होती, दादू हा पिंजारी होता, पण हरिचरणाच्या ठिकाणीं हा कांहीं भेद नव्हता. सर्व सारखेच होते. चोखामेळा हे एक हरिजन होते, पण भगवंताच्या कृपेनें त्यांना मोक्ष मिळाला. जनाबाई नामदेवांच्या घरची दासी होती पण भगवान् तिच्याबरोबर भजन करीत होते. विष्णुदास जे आहेत ते देवाच्या भजनपूजनाच्यावेळीं जातिभेद, धर्मभेद मानीत नाहींत; ते सर्व एक आहेत व तोच वेदशास्त्राचा पण निर्णय आहे.

जे पतित आहेत त्यांच्या उद्धाराचा पण तुकाराम महाराजांनीं आपल्या अभंगांत मार्ग दाखविलेला आहे. ते म्हणतात—

**जोडोनिया धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेंच करी ॥**
**उत्तमाचे गती तो एक पावेल । उत्तम भोगील जीव खाणी ॥**
**परउपकारीं नेणें परनिन्दा । परस्त्रिया सदा बहिणीमाया ॥**
**भूतदया गायीं पशूंचें पालन । तान्हेल्या जीवन वनामाजीं ॥**
**शांतीरूपें नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्त्व वडिलांचें ॥**
**तुका म्हणे हेंचि आश्रमाचें फळ । परमपद बळ वैराग्याचें ॥**

पतित संसारी लोकांना भक्तिमार्गानें मोक्ष प्राप्त करून घेतां यईल हें सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात कीं, चांगल्या सन्मार्गानें व्यापार करून, व्यवहारानें धन मिळवून त्यावर कोणत्याहि प्रकारची आसक्ति न ठेवतां जो काळजीपूर्वक त्याचा वापर करतो त्याला मोक्षप्राप्ति होते व त्याला पुनर्जन्म मिळालाच तर तोहि चांगल्या योनींत प्राप्त होतो. जो दुसऱ्यावर उपकार करतो, दुसऱ्याचें स्वप्नांत सुद्धां वाईट चिंतन करणार नाहीं व परस्त्रीला मातेसमान मानतो त्यावर परमेश्वर प्रेम करतो. जो गाई जनावरांचें चांगल्या तऱ्हेनें पालन

करतो, जंगलामध्यें प्रवासामध्यें तहानलेल्याला जो पाणी देतो तो शांतीचा पुतळा बनतो. त्यावर ईश्वर नजर ठेवतो. जो सर्वांचें चांगलें इच्छितो व गृहस्थ धर्माचें पालन करून वडिलांचें नांव वाढवितो त्याला गृहस्थाश्रमाचें फळ मिळून, शेवटीं वैराग्य प्राप्त होऊन अंतीं मोक्ष मिळतो.

**वेद अनन्त बोलिला । अर्थ इतुकाची साधिला**
**विठोबासी शरण जावें । निजनिष्ठें नाम गावें ॥**
**सकळ शास्त्रांचा विचार । अंतीं इतुकाची निर्धार ॥**
**अठरा पुराणीं सिद्धांत । तुका म्हणे हाचि हेत ॥**

वेदामध्यें पुष्कळ ज्ञान भरलेलें आहे परंतु त्या सर्व ज्ञानाचा मतलब एकच आहे व तो म्हणजे विठोबाला शरण जाऊन मनापासून अनन्य भावानें त्याची भक्ति सेवा करणें हाच मोक्षप्राप्तीचा मार्ग होय. हाच सर्व वेद, धर्मशास्त्रें पुराणें ह्यांनी मांडिलेला मोक्षप्राप्तीचा एकमेव सिद्धान्त होय.

**मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास । कठीण वज्रास भेदूं ऐसे ॥**
**मेले जित असों, निजोनियां जागे । जो जो जें जें मागे तें तें देऊं॥**
**मायबापाहूनि बहु मायावन्त । करूं घातपात शत्रूहूनि ॥**
**अमृत तें काय गोड आम्हापुढें । विष तें बापुडें कडू किती ॥**
**तुका म्हणे आम्ही अवघेंचि गोड । ज्याचे पुरे कोड त्याचे परी ॥**

आम्ही विष्णुदास हरीचे सेवक हे मनानें मेणापेक्षां मऊ आहोंत पण वेळच पडली तर आमचें अंतःकरण वज्रापेक्षांहीं कठोर होऊं शकतें. आम्ही मरून सुद्धां जिवंत राहूं शकतों व झोपेपणीं पण जागे असतों. जो जें कांहीं मागतो तें तें आम्ही त्यास देत असतों. आम्ही आमच्या भावावर आईबापापेक्षां जास्त प्रेम करतों व ज्याला आम्ही शत्रु मानला त्याचा संपूर्ण नाश करून टाकल्या-

शिवाय रहात नाहीं. आमचा सहवास अमृतापेक्षांही गोड आहे व वेळ आली तर विषापेक्षांही कडू जहर आम्ही बनतों. परंतु एकूण आम्ही सर्वच गोड आहोंत कारण आम्ही ज्याचे त्याचे त्याच्या इच्छेप्रमाणें लाड पुरवीत असतो.

**जे कां रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ॥**
**तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥**
**मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनांचें चित्त ॥**
**ज्यासि आपंगिता नाहीं । त्यासी धरी जो हृदयीं ॥**
**दया करणें जें पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥**
**तुका म्हणे सांगूं किती । तोचि भगवंताची मूर्ति ॥**

जो कोणी दुसऱ्याचें दुःख जाणून दूर करण्याचा प्रयत्न करतो तोच खरा साधु होय. त्याच्या ठिकाणींच खरा ईश्वराचा अंश वसलेला आहे. सज्जन लोकांचें मन हें लोण्यासारखें मऊ असतें; आंत बाहेर तें सारखेंच असतें व अनाथ—ज्याला आधार नाहीं—अशाला आश्रय देत असतें. अनाथावर मनापासून दया करून दासदासी, नोकर ह्यांच्यावर मुलांप्रमाणें प्रेम करतात. असा जो सज्जन साधु असतो—तुकाराम म्हणतात, तोच खरा परमेश्वर, प्रत्यक्ष परमेश्वर होय. ती परमेश्वराची चालती बोलती मूर्तीच होय.

**न मिळो खावया न वाढो संतान । परि हा नारायण कृपा करो ॥**
**ऐसी माझी वाचा मज उपदेशी । आणिक लोकांसी हेंचि सांगे ॥**
**विटंबो शरीर, होत कां विपत्ती । परी राहो चित्तीं नारायण ॥**
**तुका म्हणे नाशिवंत हें सकळ । आठवी गोपाळ तेंचि हित ॥**

आम्हाला मुलबाळ होवो न होवो, खाण्यापिण्यास मिळो न मिळो, परंतु ह्या नारायणाची आमच्यावर कृपा ही झालीच पाहिजे. माझें मन माझी वाणी मला हेंच सांगते व दुसऱ्यांनाही हेंच सांगो अशी माझी

इच्छा आहे. माझ्या मनाची कांहींहीं स्थिति असो, शरिरांत कोणतेही रोग होवोत दुर्गंधी येवो, पण मनामध्यें नारायण व हरि कधींही नाहींसा होऊं नये. तुकाराममहाराज म्हणतात, हा सर्व संसार नाशिवंत आहे, तेव्हां जर मनाला शांति मिळवावयाची असेल तर गोपाळाचें श्रीनारायण हरीचें स्मरण करणेंच योग्य होय.

**काय वानूं आतां न पुरे हे वाणी । मस्तक चरणीं ठेवीतसे॥**
**थोरीव सांडली आपुली परीसें । नेणे शिवों कैसें लोखंडासी ॥**
**जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टवीती पर उपकारें॥**
**भूतांची दया हें भांडवल संतां । आपुल्या ममता नाहीं देहीं ॥**
**तुका म्हणे सुख पराविया सुखें । अमृत हें मुखें स्रवतसे ॥**

संतांच्या मोठेपणाचें वर्णन मी काय करूं बरें ? माझी वाणी कांहीं बोलूंच शकत नाहीं. मी त्यांच्या स्मरणानेंच केवळ त्यांच्या चरणावर मस्तक ठेवतों. परिसाचा दगड असतो. त्याच्या मनाचा मोठेपणा कसा बरें वर्णन करावा ? त्याचें कामच मुळीं लोखंडाचें सोनें करणें. तो कांहीं मनांतून विचार करीत नाहीं. ह्या नीच लोखंडाला कसा बरें स्पर्श करूं ? तसेंच खऱ्या सज्जन लोकांचें आहे. त्यांचा अवतारच जगाच्या कल्याणाकरितां आहे. लोकांच्या कल्याणाकरितांच लहान मोठेपणाच्या कल्पनांचा विचार न करतां आपला देह झिजवीत असतात. स्वतःच्या देहाला कष्ट झाले तरी ते आपला गुणधर्म सोडीत नाहींत. प्राणिमात्रावर दया करणें हा संतसज्जन लोकांचा मनोधर्मच आहे. त्यांची स्वतःच्या देहावर ममता नसते. लोकांच्या सुखांतच ते आपलें सुख मानतात व आपला देह झिजवीत असतात. दुसऱ्या जीवनाचें आपण विष पचवून अमृत बनवीत असतात.

**जेथें जातो तेथें तूं माझा सांगाती । चालविसी हातीं धरूनीया ॥**
**चालों वाटे आम्ही तुझाची आधार । चालविसी भार सर्व माझा ॥**

**बोलों जातां बरळ करिसी तें नीट । नेली लाज धीट केलों देवा ॥**
**अवघे जन मज झाले लोकपाळ । सोईरे सकळ प्राण सखे ॥**
**तुका म्हणे आतां खेळतों कौतुकें । झालें तुझें सुख अन्तर्बाहीं ॥**

हे भगवन् ! जेथें जेथें मी जातों, तेथें तेथें तूं माझ्याबरोबर आहेसच. जणूं कांहीं माझा हात पकडून तूं मला माझ्या बरोबरच नेत आहेस असें मला वाटतें. आम्हांला असें वाटतें कीं, जणूं कांहीं आम्ही आमच्या ताकदीवरच चालत आहोंत, पण खरी गोष्ट अशी आहे कीं तूं स्वतःच आम्हांस ताकद देत असतोस व त्याच्यावर आम्ही चालत असतों. माझा सर्व भार तूंच तुझ्या हातानें हलवीत आहेस. माझ्या तोंडून जरी कांहीं अपशब्दांची बडबड होऊं लागली तरी तूंच मला सांभाळून घेतोस, माझ्या तोंडून योग्य ते शब्द येण्याची व्यवस्था करतोस व माझे अपशब्द सुधारतोस व योग्य तीच भाषा येते. माझी लाज राखण्याकरितां तूं निर्लज्ज बनतोस व मला बळ देऊन धीट बनवतोस. सगळी जनता, हे माझे लोकपाळ (राजे) बनून माझे प्रजा म्हणून पालनपोषण करोत, आइते सर्वजण माझे प्राणसखे बनून नातेवाईका-सारखें माझें पालनपोषण करीत आहेत. सर्वजण माझे मित्र बनलेले आहेत. तुझें दर्शन व तुझें दर्शनसुख मला अंतर्बाह्य मिळाल्यामुळें मी आनंदित होतों व स्वतःशींच मोठ्या कौतुकानें खेळत बसतों.

**क्षमाशस्त्र जया नराचिया हातीं । दुष्ट तयाप्रति काय करी ॥**
**तृण नाहीं तेथें पडला दावाग्नी । जाय तो विझोनी आपसया ॥**
**तुका म्हणे क्षमा सर्वांचें स्वहित । धरा अखंडित सुखरूप ॥**

ज्या मनुष्याजवळ क्षमेचे मोठें जबरदस्त शस्त्र आहे त्याला दुष्ट मनुष्य काय करणार? ज्या ठिकाणीं गवत नाहीं अशा ठिकाणीं अग्नी पडला तर तो जाळणार कोणाला? तो आपोआपच नाहींसा होतो. तेव्हां तुकाराम महाराज म्हणतात जर आपलें व सर्वांचें हित

साधावयाचें असेल व सगळ्यांकडून मोठेपणा मिळवायचा असेल तर क्षमा शस्त्राचें पालन करावें.

**आणीक दुसरें मज नाहीं आतां । नेमिलें या चित्ता पासुनियां ॥**
**पांडुरंग ध्यानीं, पांडुरंग मनीं । जागृतीं स्वप्नीं पांडुरंग ॥**
**पडिलें वळण इंद्रिया सकळां । भाव तो निराळा नाहीं दुजा ॥**
**तुका म्हणे नेत्रीं केली ओळखण । तटस्थ हें ध्यान विटेवरी ॥**

मी माझ्या मनामध्यें विठ्ठलाशिवाय कोणतेंही ध्यान धरीत नसतों. माझ्या ध्यानीं, मनीं, जागतेपणीं किंवा झोपेंत सतत पांडुरंग बसलेला असतो. सर्व इंद्रियांना तें एक वळणच पडून गेलेलें आहे. माझ्या मनामध्यें पांडुरंगाशिवाय दुसरें तिसरें कांहींही नसतें. माझ्या डोळ्या-मध्यें, मनामध्यें जी एक विठ्ठलाची मूर्ती ठसून राहिलेली आहे ती कधींही नाहींशीं होणार नाहीं.

**लहानपण देगा देवा । मुंगी साखरेचा रवा ॥**
**ऐरावत रत्न थोर । त्यासी अंकुशाचा मार ॥**
**ज्याचे अंगीं मोठेपण । तया यातना कठीण ॥**
**तुका म्हणे जाणे । व्हावें लहानाहुनि लहान ॥**

हे देवा ! तूं मला बालपण दे. कारण मोठेपणांत यातनाही मोठ्या आहेत. लहान मुलाला साखर खावयास मिळते, तर मोठा हत्ती असतो त्याला अंकुशाचा मार मिळत असतो. ह्याचें कारण असें आहे कीं ज्याला मोठेपणा आहे त्याला यातना पण मोठ्या असतात. तेव्हां या जगांत लहानपणच चांगलें असतें.

**कन्या सासुऱ्यासी जाये । मागे परतोनी पाहे ॥**
**तैसें झालें माझ्या जिवा । केव्हां भेटसी केशवा ॥**
**चुकलीया माय । बाळ हुरूहुरू पाहे ॥**
**जीवनावेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी ॥**

जेव्हां मुलगी सासरीं जाते तेव्हां पुन्हां पुन्हां मागें वळून पहात असते. त्याप्रमाणें माझी आज स्थिति झालेली आहे. हे देवा केशवा !

तूं मला कधीं बरें भेट देणार ? ज्याप्रमाणें लहान मुलगा आईची ताटातुट झाल्यावर इकडे तिकडे पहातो, ज्याप्रमाणें पाण्यांतून बाहेर टाकलेला मासा पाण्यावाचून तडफत असतो, त्याप्रमाणें तुकाराममहाराज देवदर्शनावांचून तडफडत आहेत. तुकाराम महाराज देवदर्शनाकरितां इतके उतावीळ झालेले आहेत व देवदर्शनाकरितां तडफडत आहेत.

**नको नको मना गुंतूं मायाजाळीं । काळ आला जवळी ग्रासावया ॥**
**काळाची हे उडी पडेल बा जेव्हां । सोडविना तेव्हां मायबाप ॥**
**सोडवीना राजा देशीचा चौधरी । आणीक सोयरीं भलीं भलीं ॥**
**तुका म्हणे तुला सोडवीना कोणी । एका चक्रपाणी वांचुनीया ॥**

हे मना ! तूं मायाजाळीं गुंतून राहूं नको. एक दिवस तुला काळ न्यावयास येणार आहे आणि एकदां कां काळ आला कीं मायबापही तुला त्या पाशांतून सोडवूं शकणार नाहीं. ह्या देशाचा बड्यांत बडा जो राजा चौधरी तो सुद्धां तुला सोडवूं शकणार नाहीं. आणि मोठे मोठे बडे खानदानी नागरिक आले तरी ते तुला सोडवूं शकणार नाहींत. तेव्हां फक्त परमेश्वर चक्रपाणीच उपयोगी पडेल. देवाशिवाय कोणीहि माणसास ह्या नश्वर जगांत त्राता नाहीं.

**रात्री दिवस आम्हां युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ॥**
**जीवाही आगोज पडती आघात । येऊनीयां नित्य नित्य वारूं ॥**
**तुका म्हणे तुझ्या नामाचिया बळें । अवघीयांचें काळें केलें तोंड ॥**

आमच्या जीवनांत रोजच युद्धाचा प्रसंग येत असतो. ही बाहेरच्या जगाशीं असलेली लढाई ही केवळ दिखाऊ आहे, पण आमच्या मनांत चालू असलेली विचारांची लढाई ही मरेपर्यंत चालू रहाणार. आमच्या मनावर अचानक नकळत असे आघात होत असतात. व आम्हांला त्यांना रात्रंदिवस तोंड द्यावें लागतें. परंतु ह्या सर्व प्रसंगांतून हे भगवन् ! केवळ, तुझ्या कृपाप्रसादामुळेंच, आमची

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ
(अनुक्रमांक) २५११३ वि: ७३।७५
१७३५ क्रमांक नों. दि. १३।७



सुटका होत असते व शत्रूंचें ( नकळत आघात करणाऱ्याचें ) आम्ही काळें तोंड करूं शकतों. तें आमचें तोंड काळें करावयास येत असतात, पण हे भगवन्, तुझ्या कृपेमुळेंच केवळ आम्ही त्यांचें तोंड काळें करूं शकतों.

**आतां तरी पुढें हाचि उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ॥**
**सकळांच्या पाया माझें दंडवत । आपुलालें चित्त शुद्ध करा ॥**
**हित तें करावें देवाचें चिंतन । करूनीयां मन एकविध ॥**
**तुका म्हणे लाभ होय तो व्यापार । करा काय फार शिकवावें ॥**

तुकाराम महाराज म्हणतात, लोक हो ! तुम्हीं अविचारी होऊन आपल्या आयुष्याचा नाश कां बरें करतां ? तुम्हा सगळ्यांच्या पायावर डोकें ठेऊन माझी अशी तुम्हाला एवढी विनंति आहे कीं विचार करा व आपली मनःशुद्धि करा. आपलें मन एकाग्र करा व मनानें चिंतन करून ईश्वराचें ध्यान धरा. त्यांतच तुमचें हित आहे. मी तुम्हास अधिक काय शिकवूं ? एवढेंच सांगतों कीं ज्यानें ईश्वरलाभ, मोक्ष प्राप्तीचा फायदा होईल असाच केवळ व्यापार करा !

**आलीया भोगासी असावें सादर । देवावरी भार घालूनीयां ॥**
**मग तो कृपासिंधु निवारी सांकडें । येर तें बापुडें काय रंक ॥**
**भवाचिया पोटीं दुःखाचीया राशी । शरण देवासी जातां भलें ॥**
**तुका म्हणे नव्हे काय त्या करीतां । चिंतावा तो आतां विश्वंभर ॥**

जें दुःख केवळ आपल्या प्रारब्धानें उत्पन्न झालेलें आहे तें केवळ देवावर भरंवसा ठेऊन सहन केलें पाहिजे. असें केलें तर तो दयासागर मोठ्या संकटाच्या मालिकेंतूनसुद्धां आपली सुटका करील. भगवन्ताची कृपा असेल तर संकटें काय करणार ? भवसागरामध्यें संकटें फारच असतात. भीतीच्या पोटीं दुःखांचा उगम आहे म्हणून ईश्वराला आपण शरण गेलें पाहिजे. भीति सोडली पाहिजे. तेव्हां व्यर्थ चिंता करण्याऐवजीं ईश्वराचें चिंतन करावें.

**वेदांचा तो अर्थ आह्मासीच ठावा। येरांनीं वहावा भार माथा॥**
**खादल्याची गोडी देखिल्यासी नाहीं। भार धनवाहो मजुरीचे॥**
**उत्पत्ति पाळण संहाराचें निज। जेणें नेलें बीज त्याचें हातीं॥**
**तुका ह्मणे आह्मां सांपडलें मूळ। आपणाचि फळ आलें हाता॥**

वेदाचा खरा अर्थ केवळ आम्हालाच कळतो. दुसरे लोक केवळ ज्ञानाचें ओझें आपल्या डोक्यावर वहात असतात. जो खातो त्यालाच त्या पदार्थाची चव कळूं शकते. पहाणाराला ती कळणार नाहीं. हे विद्वान् लोक केवळ पैशाच्या प्राप्तीकरतां ज्ञानाची मजुरी करीत असतात व पाठाचें पुस्तकी ज्ञान वहात असतात. उत्पत्ति, पालन, संहार हा सर्व जगाचा मूलमंत्र आहे. हें ज्याला समजलें त्यालाच खरा जीवनाचा अर्थ समजला. तोच ज्ञानी झाला. ह्या ज्ञानाचें फळ आमच्या हातीं आलेलें आहे.

**नाम घेतां उठाउठीं। होय संसाराची तुटी॥**
**ऐसा लाभ बांधा गांठी। विठ्ठलपायीं पडे मिठी॥**
**नामापरितें साधन नाहीं। जें तूं आणिक करीसी कांहीं॥**
**हाकारोनीं सांगे तुका। नाम घेतां राहों नका॥**

आम्ही विष्णुदास भगवान् विष्णूचें नांव घेतां हा सबंध भवसागर तरून जातों. असा कांहीं लाभ मिळावा कीं, ज्यामुळें विठ्ठलाचें ईश्वराचें प्रत्यक्ष दर्शन घडेल, विठ्ठल चरणांवर मस्तक पडेल. प्रत्यक्ष परमेश्वराचें दर्शन घडावयाचें असेल तर ईश्वराचें नांव घेणें हा एकच मार्ग होय. त्याच्याशिवाय मोक्षप्राप्तीचें दुसरें साधन नाहीं. तेव्हां पुन्हां पुन्हां ओरडून तुकाराममहाराज सांगत आहेत कीं, ईश्वराचें नांव घेतल्याशिवाय राहूं नका.

**हेंचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा॥**
**गुण गाईन आवडी। हेंची माझी सर्व जोडी॥**
**नलगे मुक्ति धनसंपदा। संतसंग देई सदा॥**
**तुका म्हणे गर्भवासी। सुखें घालावें आम्हांसी॥**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ
अनुक्रम २५११३ दि: 3/104
1835

तेव्हां हे भगवन् ईश्वरा !—तुकाराम महाराज म्हणतात, जर मला कांहीं दान द्यावयाचें असेल तर तुझें कधींही विस्मरण होऊं नये हेंच दान दे. तुझें प्रेमानें मी जर गुणगान केलें तर मला मोक्ष प्राप्त होईल. मला धनदौलत अगर कोणत्याही प्रकारची इच्छा नाहीं. मला केवळ सत्संग, चांगली संगत, हवी आहे. मला पुनर्जन्माची भीति नाहीं. पण जर परत द्यावयाचा असेल, तर केवळ तो तुझ्या सेवेकरितां, नामस्मरणाकरितांच दे. तुझी अपुरी राहिलेली सेवा पूर्ण करण्याकरितां परत जन्म घेण्यासही केव्हांही मी स्वखुषीनें तयार आहें.

**फोडिलें भांडार धन्याचा हा आल । मी तंव हमाल भारवाही**
**तुका म्हणें चाली झाली चहूं देंशी । उतरला कसा खरा माल**

हा सर्व माल माझ्या मालकाचा म्हणजे ईश्वराचा आहे. ह्या ज्ञानभांडाराचा मालक ईश्वर असून मी त्याचा केवळ एक हमाल आहें. मी चालत चालत प्रवास करीत ह्या देशांत आलों आहें, पण माझा नामरूपी माल मालकाच्या पूर्ण कसोटीस उतरला असावा असें मला वाटलें. ईश्वराच्या मोठेपणाविषयीं व स्वतःच्या कवित्वशक्तिविषयीं तुकाराम महाराजांच्या कल्पना अशा विचित्र आहेत. ईश्वराला केवढा मान दिला आहे व स्वतःकडे कसा कमीपणा घेतला आहे. विद्या विनयानें नम्रपणानें शोभते हेंच खरें.

शिवकालीन मोंगल अमदानीत ह्या महाराष्ट्रीय कवींनीं हिंदीमध्यें ही काव्यरचना केली हें ऐकून कित्येकांना आश्चर्य वाटेल पण तें एक सत्य आहे. तुकाराममहाराजांनीं पण कांहीं हिंदीमध्यें अभंग केले ते इथें देऊन त्यांचें छोटेसें गोष्टीरूप चरित्र इथें संपवितों—

**आप तरे त्याकी कौन बऱ्हाई । औरनकु भलो नाम धराई ॥**
**काहे भूमी इतना भार राखे । दुभत धेनु नहीं दूध चाखे ॥**
**बरसत मेघ फलत नही बिरखा । कोन काम अपनी उन्हो तिरखा ॥**
**काहे चंदा सूरज खावे फेरा । खिन एक बैठ न पावत घेरा ॥**

कहे परीस कंचन करे धातु । नहि मोल तुटत पावत धातु ॥
कहे तुका उपकारही काज । सब कर रहिया वह रघुराज ॥
बार बार काहे मरत अभागी । बाहुहि मरनसे क्या तोरे भागी ॥
ये ही तन करते क्या ना होये । भजन भगतिकर वैकुंठ जाय ॥
रामनाम मोल नहीं बेचैं कबरी । वोही सब माया छुरावत झगरी
कहे तुका मनसूं मिल राखो । रामरस जिव्हानित चाखो ॥

अल्ला देवे अल्ला दिलावे । अल्ला दारू अल्ला खिलावे ॥
अल्लाबिगर नहीं कोय । अल्ला करे सोई होय ॥
मर्द होय तो खडा फीर । नामर्दकू नहीं धीर ।
अपने दिलकू करना खुसी । तीन दामका क्या खुमासी ॥
सब रसोंका किया मार । भजन गाली एकहि सार ॥
इमान तों सबहीं सखा । थोडी तो भी लकर ज्यो ॥
जिन्हें पास नीत सोय । वो ही बसकर ते रोवे ॥
सांतो पांचो मार लगावे । उतार सो पीछे खावे ॥
सब ज्वानी निकल जावे । पीछे गधडी मटी खावे ॥
गांवढाल सो क्या लेवे । हगवनी भरी नहीं धोवें ॥
मेरी दारू जिन्हनें खाया । दीदार दर्गा सोई पाया ॥
तल्ले मुंढी घाल जावे । बिगारी सोवे क्या लेवे ॥
बजार का बुझे भाव । वोही पूछत आवे ठाव ॥
फोकट बाँटू कहे तुका । लेवे सोही लेवो सखा ॥

अल्ला करे सोहम बाबा । करतार का सिरताज
गाऊ बछरे तीस चलावे । यारी बाधो न सात ॥
ख्याल मेरा साहेब का । बाबा हुवा करतार ॥
व्हांटे आघे चढे पीठ । आये हुवा असवार ॥
जिकिर करो अल्ला की बाबा । सबल्या-अन्दर भेस ॥
कहे तुका जो नर बुझे । सोहि भया दरवेस ॥

१०५८५

REFBK-0010585
REFBK-0010585